# नोटीस

तमाम जनतेस विशेषत: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील संचालक, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी तसेच सर्व संबंधित विद्यार्थ्यांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठाशी निगडीत विविध प्रश्नासंबंधीची तक्रार / विनंती अर्ज संबंधितांनी आपापल्या संचालक / प्राचार्यांमार्फत विद्यापीठास सादर करावेत. तसेच या संबंधी विद्यापीठातील कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याशी परस्पर दूरध्वनी / ईमेल इत्यादीद्वारे संपर्क साधू नये.

विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनादेखील सूचित करण्यात येते की, त्यांनी विहीत मार्गाशिवाय आलेले कोणतेही अर्ज / तक्रारी स्विकारु नयेत, तसेच अर्ज अथवा तक्रारी संबंधी अर्जदार / तक्रारदार यांचे दूरध्वनी स्विकारु नये अथवा ईमेल ची दखल घेऊ नये. तसेच पूर्वपरवानगी शिवाय त्यांना दूरध्वनी करु नये.

वरील सूचनांचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

जा. क्र. :- पुअहोसोविद्या/परीक्षा/1553

11 JUL 2023

सही/-

परीक्षा व मूल्यमापन मंडळ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ,**
**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर**
**सोलापूर विद्यापीठ**